**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन तयार होणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सवा'त प्रतिपादन.**
2. **रिझर्व्ह बँकेकडून सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा, रेपो दर पाव टक्क्यांनी कमी करुनसव्वा ६ टक्क्यांवर.**
3. **महाराष्ट्र निवडणुकीत 7 लाख नवीन मतदार कसे जोडले गेले? -विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांचा निवडणुक आयोगाला प्रश्न; विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण.**
4. **महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवकालीन इतिहास हा प्रत्येकाच्या मनात शौर्याची भावना निर्माण करणारा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपुरात शिवकालीन शस्त्र व वाघनखे प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी गौरवोद्गार.**

## ॲडव्हान्टेज विदर्भ-२०२५

देशातली सर्वात मोठी औद्योगिक इकोसिस्टीम विदर्भात गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेऊन तयार होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. विदर्भाच्या मेगा इंडस्ट्रियल एक्स्पो, बिझनेस कॉन्क्लेव्ह आणि इन्व्हेस्टमेंट समिट 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५-खासदार औद्योगिक महोत्सव' चे आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, येथे उद्घाटन झाले. या सोहळ्यात ते मुख्य अतिथी म्हणून संबोधित करत होते. गडचिरोलीमध्ये होऊ घातलेल्या 'स्टील रेवोल्युशन'चा फायदा नजीकच्या सर्व जिल्ह्यांना होईल, असा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला….

***हम लोग गडचिरोली में एयरपोर्ट तैयार करेंगे। हमने उसका वायलेंस सर्वे कंप्लीट कर लिया। दो तीन ऑब्स्ट्रक्शन हैं उसको हम हटाएंगे और अब हम जल्दी ही एयरपोर्ट की जमीन का लैंड एक्विजिशन तैयार कर रहे हैं और मुझे विश्वास है कि आने वाले दो- तीन सालों में गड़चिरोली में एक अच्छा एयरपोर्ट होगा क्योंकि सीधे हम लोगों को जो लैंड मिली है चार किलोमीटर एक सिंगल स्ट्रेच की लैंड हमको वहाँ मिली है कोई भी एयरक्राफ्ट जहाँ पर लैंड हो सके इस प्रकार का एयरपोर्ट हम लोग गडचिरोली में तैयार करने जा रहे हैं।***

ते म्हणाले, वर्धन लिथियमच्या 42000 कोटींच्या सामंजस्य करारामुळे विदर्भात एक पथदर्शी इकोसिस्टीम तयार होत आहे. ‘कॉटन टू फॅशन’ अशी परिपूर्ण इकोसिस्टीम अमरावतीमध्ये पीएम मित्र पार्कच्या माध्यमातून तयार होत आहे.संरक्षण विषयक उत्पादनात लागणाऱ्या कापसाच्या उपयोगितेबद्दल देखील माहिती देत त्यांनी संभाव्य इकोसिस्टीमबद्दल त्यांनी चर्चा केली. आगामी पाच वर्षात गडचिरोली हे भारताचे स्टील हब होईल आणि संपूर्ण विश्वात गडचिरोलीतून निर्यात होईल असा विश्वास केंद्रीय मंत्री गडकरी यांनी व्यक्त केला. चंद्रपूर आणि भद्रावती मध्ये ग्रीन स्टील विषय प्रकल्प येत असल्याचे देखील ते म्हणाले. रायपूर ते विशाखापट्टणम 36000 कोटींचा एक्सप्रेस हायवे आपण तयार करत असल्याचे सांगून गडचिरोली जिल्ह्यातून थेट रायपुर - विशाखापट्टणम एक्सप्रेस हायवेला जोडून आपण माल निर्यात करू शकाल आणि गरज भासल्यास काकीनाडाला देखील घेऊन जाऊ म्हणजे मुंबईला जाण्याची गरज न पडता दळणवळणाचे खर्च कमी होतील आणि जगभरात इथून निर्यात होईल असे ते म्हणाले. विदर्भाने आत्मनिर्भर भारत तयार करण्यात योगदान द्यावे असं ते म्हणाले,

***विदर्भ समृद्ध संपन्न होगा और विदर्भ जो प्रधानमंत्री जी का सपना है। फाइव ट्रिलियन डॉलर की इकोनॉमी आत्मनिर्भर भारत वर्ल्ड की थर्ड लार्जेस्ट इकोनॉमी इसमें विदर्भ की आर्थिक प्रगति और विकास बड़े प्रमाण पर कंट्रीब्यूट करेगा, लॉयल शेयर उसमें उठाएगा ।***

## परीक्षा पे चर्चा

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवारी म्हणजेच १० फेब्रुवारीला संवाद साधणार आहेत. परीक्षेच्या ताणाचं व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं पंतप्रधान या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मधे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले प्रत्येकी ३६ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. यंदा या कार्यक्रमाचे एकूण ८ भाग होणार असून उर्वरित भागात विविध क्षेत्रातल्या महत्त्वाच्या व्यक्ती त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगणार आहेत.

## १४२ कोटींचा निधी

राज्यात अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सरकार आणि नागपूर जिल्हा परिषदमध्ये कॉँग्रेसची सत्ता असतानाही ४२ कोटी रुपये अखर्चित होते. परंतु राज्याचे महसूल मंत्री आणि नागपूर व अंमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांच्याकडून हा अखर्चित निधी मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेला १४२ कोटी खर्च करता येणार आहे.

या संदर्भात अलीकडेच झालेल्या नागपूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ४२ कोटी रुपयांच्या  अखर्चित निधीबद्दल माहिती मिळताच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निधी लगेच सरकारकडून प्राप्त करून घेण्याबाबत घोषणा केली होती.

## अमृतकाल:विकसीत भारत

आर्थिक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात कार्य करणा-या मनी बी इन्स्टिट्यूट प्रायव्हेट लिमिटेडच्यावतीने 'अमृतकाल: विकसीत भारत-2047' या तीन दिवसीय गुंतवणूकदार प्रशिक्षण परिषदेचा उद्या  8 फेब्रुवारी रोजी समारोप होत आहे. हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ येथे सायंकाळी 6.30 वाजता या परिषदेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह नवाब ऑफ दलाल स्ट्रीट नावाने परिचित उद्योगपती रमेश दमाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## रेपो दर

सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा देत भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज रेपो दरात पाव टक्के कपात केली. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत एकमतानं हा निर्णय झाला. त्यामुळं रेपो दर साडे ६ टक्क्यावरुन सव्वा ६ टक्के झाल्याची माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक बुधवारपासून मुंबईत सुरू झाली होती. या बैठकीत झालेल्या निर्णयांची घोषणा करताना गव्हर्नर संजय मल्होत्रा म्हणाले की, समितीनं एकमतानं रेपोदर कपातीचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी कोरोना काळात मे २०२० मध्ये बँकेनं व्याजदर पाव टक्क्यानं कमी केले होते. दोन वर्षांपूर्वी फेब्रुवारी पाव टक्क्यानं दरवाढ केल्यानंतर या दरांमध्ये अजिबात बदल झालेला नव्हता. जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं आज आर्थिक वृद्धीदरांच्या अंदाजातही कपात केली. चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. पतधोरण आढावा समितीच्या गेल्या बैठकीनंतर हा दर ६ पूर्णांक ६ टक्के राहील, अशी शक्यता वर्तवली होती. आगामी आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धीदराचा अंदाजही ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन ६ पूर्णांक ७ दशांश टक्के, इतका कमी करण्यात आला आहे. चलनवाढीच्या दराच्या अंदाजात रिझर्व्ह बँकेनं कपात केली आहे. चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ४ पूर्णांक ८ दशांश टक्के आणि पुढच्या आर्थिक वर्षात ४ पूर्णांक २ टक्के राहिल, असं रिझर्व्ह बँकेच मत आहे. बँकांमधले घोटाळे कमी करण्यासाठी बँकांच्या वेबसाइटच्या नावात bank.in लावण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. एप्रिलपासून याची सुरुवात होईल. त्यानंतर वित्तीय क्षेत्रातल्या इतर संस्थांच्या वेबसाइटच्या नावात 'fin.in' असा वापर केला जाईल. २४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या यंदाच्या वित्तीय साक्षरता आठवड्याचा

भर आर्थिक निर्णय घेण्यासाठी आणि घरखर्चातली महिलांची भूमिका सक्षम करण्यासाठी असेल, असंही रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलंय.

## राहुल गांधी पत्र परिषद

महाराष्ट्रात लोकसभेपूर्वी 32 लाख मते आणि विधानसभेपूर्वी 39 लाख मते जोडली गेली. 5 महिन्यांत 7 लाख नवीन मतदार जोडले गेले आहेत. 39 लाख मतदार कोण आहेत? ते हिमाचल प्रदेशच्या एकूण मतदारांच्या संख्येइतके आहे. महाराष्ट्रात राज्यातील एकूण मतदार लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार का आहेत? निवडणूक आयोगाने या प्रश्नांची उत्तरे मागूनही दिलेली नाहीत, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत शिवसेना खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत केला. यावेळी निवडणूक आयोगाला लक्ष्य करत पारदर्शक पद्धतीने डेटा सादर करण्याची मागणी केली. नागपूर जिल्ह्यातील कामठी विधानसभेमध्ये झालेल्या मतदान वाढीच्या बद्दल देखील राहुल गांधी यांनी प्रश्न उपस्थित केला......

***कामठी विधानसभा यहाँ पे कांग्रेस पार्टी को लोकसभा में 1.36 लॅक्स वोट मिला है। विधानसभा में तकरीबन उतना ही वोट हमें मिला 1.34 लॅक्स यह चुनाव हम जीते लोकसभा वाला लोकसभा के चुनाव में बीजेपी को 1.19 लॅक्स वोट मिलता है।इस कॉन्स्टिट्यून्सी में 35 हजार नए वोटर्स ऐड होते हैं और वो 35 के 35 हजार वोटर सीधे बीजेपी के खाते में जाते हैं और बीजेपी चुनाव जीतती है ये एक उदाहरण है। ऐसे महाराष्ट्र में अनेक उदाहरण है।***

दरम्यान, काँग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागणार असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरात प्रसारमाध्यमांना आज दिली. राहुल गांधी यांनी पराभवाबद्दल आत्मचिंतन करावं, असं ते म्हणाले....

***वोटर्स कहाँ से आए वोटर कहाँ आए, किसका नाम काटा, इसका सारा जवाब इलेक्शन कमिशन ने दिया हुआ है। इसलिए उसका अलग से जवाब देने की कोई आवश्यकता भी नहीं है।राहुल गांधी एक प्रकार से कवर फायरिंग कर रहे हैं क्योंकि उनको पता है आठ तारीख को दिल्ली के रिजल्ट के बाद उनकी पार्टी का दिल्ली में नामोनिशान समाप्त होने वाला है। इसलिए उस दिन क्या बोलना और किस प्रकार से नया नैरेटिव तैयार करना, इसकी प्रैक्टिस वो कर रहे हैं।***

विधानसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, असं निवडणूक आयोगानं म्हटलं

आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं तसंच त्यांची मतं आणि सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत असं आयोगानं समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

## वस्त्रोद्योग मंत्री सावकारे

वस्त्रोद्योग वाढविण्याकरिता आतापर्यंत सरकारने अनेक पॉलिसी तयार केल्या. यात महाराष्ट्राचे धोरण देशात सर्वोत्तम आहे. त्यामुळे राज्यांचे उद्योजकही याकडे आकर्षित होऊन गुंतवणूक करीत आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी केले. खासदार औद्योगिक महोत्सवात शुक्रवारी टेक्सटाईल्सवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते.

## वाघ नखं

महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवकालीन इतिहास हा प्रत्येकाच्या मनात शौर्याची भावना निर्माण करणारा असून आज आपण जो स्वातंत्र्य उपभोगतो आहे त्याची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज यांनी केली असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते आज नागपूरात कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित शिवकालीन शस्त्र व वाघनखे प्रदर्शनाचा उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्परमुख्य सचिव विकास खारगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते एका शिवकालीन स्मरणिकेचे आणि वाघनख पोस्ट तिकिटाचे अनावरण करण्यात आले. शिवकालीन शस्त्र व वाघनखे प्रदर्शनासाठी येथील मध्यवर्ती संग्रहालय येथे विशेष दालन निर्माण करण्यात आले असून पर्यटकांसाठी सुविधा केंद्राची निर्मिती केली आहे. व्हिक्टोरीया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालय, लंडन येथून सर्वांना पाहण्यासाठी आणलेली वाघनखे व यासोबत शिवशस्त्र हे प्रमुख आकर्षण राहणार आहे. हे प्रदर्शन तब्बल 8 महिने नागपुर सह विदर्भातील नागरीक, शिवप्रेमी करीता ऊपलब्ध राहणार आहे.

*****